पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १७/०९/२०२०

# दामरंचा व लाहेरी येथील नागरिकांनी नक्षल बॅनरची होळी करत दर्शविला "विलय दिवसाचा" प्रखर विरोध

- **मा. प्रभारी पोलीस अधीक्षकांकडुन ग्रामस्थांचे कौतुक**

दिनांक २१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२० रोजी नक्षलवाद्यांकडून **"विलय दिवस"** सप्ताह पाळणार जाणार आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी नक्षलवाद्यांकडून गडचिरोली जिल्ह्यातील उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत येणाऱ्या उपपोस्टे दामरंचा हद्दीतील वेलगुर फाट्याजवळ व उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या उपपोस्टे लाहेरी हद्दीतील मौजा मल्लमपडूर या ठिकाणी **"विलय दिवस"** सप्ताह पाळण्याबाबत नागरिकांना आवाहन करणारे बॅनर लावुन दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा हा प्रयत्न मौजा मलमपडूर व वेलगुर येथील नागरिकांनी हाणुन पाडत नक्षलवाद्यांनी लावलेले बॅनर काढुन त्याची होळी केली आहे. यावेळी उपस्थित नागरिकांनी **'नक्षलवादी मुर्दाबाद, लोकशाही जिंदाबाद'** च्या घोषणा दिल्या.

गडचिरोली पोलीस दल आमच्यासाठी नेहमीच विविध शासकीय योजनांची माहिती देवुन योजनांचे प्रत्यक्ष लाभ आम्हा आदिवासी बांधवांपर्यंत उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करत असतात. याउलट नक्षलवादी निष्पाप नागरिकांचा खुन करुन समाजामध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत असतात. त्याच बरोबर आमच्या पर्यंत शासनाच्या योजनांची माहिती पोहचु नये यासाठी सप्ताहाच्या नावाखाली रस्त्यावर झाडे पाडुन आमचे जनजीवन विस्कळीत करण्याचा प्रयत्न करत असतात. या नक्षलवाद्यांचा जाहीर निषेध करण्यासाठी आम्ही गावकऱ्यांनी एकत्र येवुन **"विलय दिवस"** सप्ताहाचा प्रखर विरोध दर्शवत नक्षलवाद्यांनी लावलेल्या बॅनरची होळी करत असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले.

लोकशाही विरोधी व संविधान न मानणारे नक्षलवादी वेगवेगळ्या सप्ताहाच्या नावाखाली स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु मौजा मलमपडुर व वेलगुर येथील नागरिकांनी पुढाकार घेवुन नक्षलवाद्यांच्या **"विलय दिवस"** सप्ताहाला विरोध करण्याबरोबरच नक्षल बॅनरची होळी केली. याबद्दल मा. प्रभारी पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल सो. यांनी **मौजा मलमपडुर व वेलगुर** येथील समस्त ग्रामस्थांचे कौतुक केले आहे.





